डिजीटल बॅनर
विनायल प्रिंटींग
वनवे व्हिजन
बॅकलाईट
लग्न पत्रिका
बिलबुक
व्हिजीटींग कार्ड
फोटो फ्रेम
HD QUALITY PRINT
प्रिंटींगचे सर्व कामे आता एकाच ठिकाणी...!
JD
डिजीटल बॅनर प्रिंट
721 969 3006
866 841 5249
तुळजाई कॉम्पलेक्स,साठे चौक,बीड

सत्यमेव जयते
साप्ताहिक
# दिव्य आधार
https://epaper.divyaaadhar.com

संपादक : शेख रिजवान
मो. 9561840184 rizwanshaikhekmat33@gmail.com


ग्राऊंड रिपोर्टींग
पान ४ वर

बीड वर्ष १२ वे, अंक ४३, सोमवार, दि. ३० जून २०२५ RNI/MAHMAR/2013/54433 पाने-४ किंमत १ रुपया

# दुसऱ्या जिल्ह्यातील यु-डायस क्रमांक टाकून बीड शहरात शाळा सुरु

## शाळा स्थलांतरीतच्या नावावर मोठी बोगसगिरी होत असल्याची शंका; विद्यार्थी व पालकांची फसवणूक

बीड । दिव्य रिपोर्टर

शहरातील नगर रोड ग्रामसेवक कॉलनी परिसरातील एका शाळेच्या फलकाकडे लक्ष गेल्यानंतर त्या शाळेच्या फलकावर यु-डायस नंबर दुसऱ्या जिल्ह्याचे असल्याचे दिसून आले. शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क करून त्या यु-डायस नंबरसंदर्भात विचारणा केली असता हा यु-डायस नंबर आपल्या बीड जिल्ह्याचा नसल्याची माहिती शिक्षण विभागातून मिळाली. नेमके हे काय प्रकरण आहे म्हणून पाठपुरावा केला असता शाळा स्थलांतरीतच्या नावावर मोठी बोगसगिरी सुरू असल्याची शंका व्यक्त केली जात असून पालकांनी सावधान राहण्याची गरज वाटत आहे. ज्या शाळेत आपल्या पाल्यांचे आपण ॲडमिशन करतो ती शाळा अधिकृत आहे का? याकडे पालकांनी आता विशेष लक्ष देणे गरजेचे झाले आहे. बीडच नव्हे तर केज, नेकनूर येथील शाळांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून शिक्षणविभाग मात्र अशा अनाधिकृत

### पालकांनो सावधान! युडायस नंबर व शाळांची मान्यता संचिका तपासूनच विद्यार्थ्यांना शाळेत दाखला मिळवा

**केज तालुक्यातील शाळेच्या फलकावर बारा अंकी यु-डायस क्रमांक दिसून आल्याने खळबळ तर नेकनूर येथील एका शाळेच्या फलकावर यु-डायस नंबरची नोंद नसल्याने अशा शाळा संशयाच्या विळख्यात शिक्षण विभाग झोपेत, शिक्षणाधिकारी यांनी फिल्डवर फिरून शाळा तपासण्याची गरज**

शाळेकडे का दुर्लक्ष करत आहे हे मात्र समजून येत नाही. आता शिक्षणाधिकारी यांनीच फिल्डवर फिरून शाळा तपासाव्यात अशी पालकवर्गातून मागणी होत आहे.

दुसऱ्या जिल्ह्याचे यु-डायस नंबर टाकून बीड शहरात शाळा सुरू करणे हे कितपत योग्य आहे? बीड शिक्षण विभागाला हे मान्य आहे का? जर मान्य नाही तर भररस्त्यात अशाप्रकारे इतर जिल्ह्याचे यु-डायस क्रमांक शाळेच्या फलकावर नमूद करून सुरू असलेल्या शाळा शिक्षणविभागाला का दिसून येत नाहीत? असे अनेक प्रश्न यातून उपस्थित झाले असून दिव्य आधारच्या प्रतिनिधीने संबंधित शाळेला भेट दिल्यानंतर त्या शाळा प्रशासनाच्या जबाबदार व्यक्तीने फोन करून आम्ही ही शाळा बीड शहरात स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव पाठविलेला आहे आणि लवकरच शाळा बीड शहरात स्थलांतरीत होणार आहे. शाळा ज्यावेळी नियमाने स्थलांतरीत होईल व बीड शिक्षणविभाग त्या शाळेला बीड शहरात शाळा सुरू करण्याची मान्यता देईल त्यावेळी सदरील शाळा सुरू करण्यास काही हरकत नाही. परंतु अशाप्रकारे इतर जिल्ह्याचे यु-डायस क्रमांक टाकून बीड शहरात शाळा सुरू करणे म्हणजे ही शिक्षणविभाग, पालक व विद्यार्थ्यांची फसवणूकच म्हणावी लागेल. एकंदरीत शाळा स्थलांतरीतच्या नावावर बीड शहरच नव्हे तर जिल्हाभरात मोठी बोगसगिरी सुरू असल्याची शंका व्यक्त केली जात असून शिक्षणविभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. तसेच पालकांनीही ज्या शाळेत आपल्या पाल्यांचे ॲडमिशन करत आहोत ती शाळा मान्यताप्राप्त आहे का? याचाही पाठपुरावा करण्याची गरज असून अशाप्रकारे बीड जिल्ह्यात किती अनाधिकृत शाळा सुरू आहेत याची दिव्य आधार लवकरच पोलखोल करणार आहे.

### स्थलांतरापूर्वी दोनशे विद्यार्थ्यांचे ॲडमिशन

शहरातील नगर रोड परिसरात ग्रामसेवक कॉलनीला लागून जी शाळा सुरू आहे त्या शाळेच्या फलकावर यु-डायस क्रमांक इतर जिल्ह्याचा असल्याचे दिसून येते. मिळालेल्या माहितीनुसार संबंधित शिक्षणसंस्थेने ती शाळा स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव दाखल केलेला आहे. परंतु सध्या ती शाळा स्थलांतरीत झालेली नाही. शाळा स्थलांतरीत होण्यापूर्वीच संबंधित शाळेत दोनशेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना ॲडमिशन देण्यात आले असून जर ती शाळा स्थलांतरीत झाली नाही तर विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न पुढे उपस्थित होवू शकतो. तसेच सदरील शाळेच्या आसपास काही अंतरावरच इतर शाळा आहेत. जरी स्थलांतराचा प्रस्ताव पास झाला तरी इतर शाळेच्या डिस्टन्सचा प्रश्न उपस्थित होणार, शिक्षण विभागाने सर्व बाबी तपासूनच स्थलांतराचा प्रस्ताव पास करावा.

### केजमधील त्या शाळेच्या फलकावर बारा अंकी यु-डायस क्रमांक

केज शहरात एका शाळा प्रशासनाने मोठमोठ्या जाहिराती लावून आपली शाळा विद्यार्थ्यांसाठी कशी योग्य आहे? हे दाखविले आहे. तसेच शाळेच्या इमारतीवरही शाळेच्या नावासह फलक लावण्यात आले आहेत. दिव्य आधारच्या प्रतिनिधीने त्या फलकावरील यु-डायस क्रमांक शिक्षणविभागाकडे पाठवून ही शाळा अधिकृत आहे का? यासंदर्भात माहिती मागविली असता शिक्षणविभागातील अधिकाऱ्यांनी तो यु-डायस क्रमांक बारा अंकाचा असल्याने आश्चर्य व्यक्त करून यु-डायस क्रमांक दहा अंकी असतात परंतु हा यु-डायस क्रमांक बारा अंकी असल्याने याची माहिती मिळणे शक्य नसल्याचे सांगितले. मिळालेल्या माहितीनुसार त्या शाळेला केज तालुक्यातील एका गावाची मान्यता आहे. परंतु संबंधित शिक्षणसंस्थेने ती शाळा केज शहरात सुरू केली असून पुन्हा याठिकाणीही शाळा स्थलांतरीतचा घोळ होत असल्याचे दिसून येत आहे. तसेच नेकनूर परिसरात एका शाळेच्या फलकावर यु-डायस क्रमांकाची नोंद नसल्याने ती शाळाही संशयाच्या विळख्यात असून शिक्षणविभागाने जिल्हाभरातील अशा शाळा शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याची गरज आहे.

# लिफ्टच्या कामाची गुणवत्ता व इस्टिमेटची तपासणी होत नाही तोपर्यंत गुत्तेदाराची बिले देवू नये

## विद्युत अभियंता व स्थापत्य अभियंता यांची विभागीय चौकशी करण्याची गरज

### जास्तीचे इस्टिमेट तयार करून शासनाची फसवणूक करण्याचे षडयंत्र असल्याचा संशय

बीड । दिव्य रिपोर्टर

नगर रोडवरील न्यायालयाच्या इमारतीला दोन लिफ्ट बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदरील कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातून ७० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला असून २० लाखांचे लिफ्टचे फाउंडेशन आणि ५० लाख रुपये लिफ्ट बसविण्याकामी खर्च होणार आहे. ७० लाख रुपयांत जर नियमाने काम झाले तर दोन



मजला इमारत तयार होवू शकते परंतु फक्त लिफ्ट आणि फाउंडेशनच्या कामासाठी ७० लाख रुपयांचा निधी देणे म्हणजे कुठेतरी ▶▶ पान २ वर...

### जास्तीचे इस्टिमेट तयार करून शासनाची फसवणूक पालकमंत्री अजितदादा पवार यांनी याप्रकरणाची आपल्या स्तरावर चौकशी करण्याची गरज

७० लाख रुपये निधी म्हणजे कमी नसतो. या ७० लाख रुपयांत जागा घेवून दोन मजली इमारत तयार करता येवू शकते. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन लिफ्टसाठी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर केला असल्याने त्या लिफ्टच्या कामावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. तसेच संबंधित गुत्तेदाराने कामही निकृष्ट दर्जाचे केल्याचे दिसून येत असून या कामासाठी वापरण्यात आलेल्या कचमध्ये बुकट्याचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आल्याचेही दिसून येत आहे. एकंदरीत या लिफ्टच्या कामासाठी जास्तीचे इस्टिमेट तयार केल्याची शंका असून यातून शासनाची फसवणूक करण्याचे हे षडयंत्र असल्याचेही दिसून येत आहे. पालकमंत्री अजितदादा पवार यांनी आपल्या स्तरावर या ७० लाखांच्या लिफ्टची चौकशी करावी, जेणेकरून जास्तीचे इस्टिमेट तयार करून शासनाची फसवणूक झाली का? या सर्व बाबी समोर येतील.

# बीड अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी एस आय टी चौकशीची धनंजय मुंडे यांची मागणी

## अशा नीच नराधमांना व त्यांना मदत करणाऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, यासाठी प्रयत्न करणार - धनंजय मुंडे

बीड । दिव्य रिपोर्टर

बीडच्या उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेला प्रकार दुर्दैवी व संतापजनक आहे. यातील आरोपी विजय पवारला राजकीय बळ आहे, बीडचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या आश्रयाने व वरदहस्ताने या लोकांची इथपर्यंत मजल गेली आहे. या प्रकरणी व्यवस्थित तपास होऊन याधीही असे गुन्हे या लोकांनी केले आहेत का, याची सविस्तर चौकशी होणे अपेक्षित आहे, म्हणून आपण या प्रकरणी एस आय टी चौकशीची राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे मागणी करणार असल्याचे माजी मंत्री, आमदार धनंजय मुंडे यांनी आज बीड येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हटले आहे.



हा प्रकार गेल्या वर्षभरापासून सुरू होता, त्या अल्पवयीन भगिनी ने जी अत्याचार सहन केला, त्याची पीडा ती स्वतः व तिचे पालकच समजू शकतात. मात्र या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतरही आरोपी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या सोबत होते, अशी माहिती मिळाली आहे. त्यांचे संबंध नेमके कशाचे आहेत? हे संबंध आर्थिक आहेत की आणखी काही असा घणाघात आ.धनंजय मुंडे यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची महिला आयपीएस अधिकार्यामार्फत एसआयटी नेमून चौकशी केली जावी असेही आ.धनंजय मुंडे म्हणाले.

बीडच्या उमाकिरण शैक्षणिक संकुलात घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर आ.धनंजय मुंडे यांनी रविवारी माध्यमांशी संवाद साधला. उमाकिरण मध्ये एक प्रकार समोर आलाय मात्र अशा अनेक घटना घडलेल्या असाव्यात असा संशय असल्याचे आ.मुंडे म्हणाले. कमी शुल्काचे आमिश दाखवून विद्यार्थ्यांना वाममार्गाला लावण्याचा प्रकार विजय पवार व त्याच्या सहकार्याच्या माध्यमातून होत होता असा दावाही आ.धनंजय मुंडे यांनी केला आहे.आरोपी विजय पवार, प्रशांत खटोकर यांना हे सर्व करता आले त्यामागे त्याला राजकीय आश्रय होता. गुन्हा दाखल झाला त्या दिवसाचे दोन आरोपी आणि त्या पाठबळ देणार्यांचे सीडीआर काढावेत असे आव्हान देखील आ.धनंजय मुंडे ▶▶ पान २ वर...

# बीडमध्ये २०० कोटींचे स्टेडिअमचा दावा करणाऱ्या वक्फबोर्डला स्वत:च्या कार्यालयाच्या जागेसाठी नगरप्रशासनाकडे हात पसरविण्याची वेळ

बीड । दिव्य रिपोर्टर

बीड जिल्ह्यात वक्फबोर्डची अंदाजे १७ हजार एक्कर जागा अधिकृत आहे. परंतु यातील अनेक जागेवर अतिक्रमण किंवा भूमाफियांनी बोगस खालसा करून जमिनीची खरेदी-विक्री केलेली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात इनामी जागा असताना वक्फबोर्ड कार्यालयाची दैना काही फिटेना अशी अवस्था झालेली आहे. अशातच वक्फबोर्ड मंडळाने महत्त्वाचा निर्णय घेत बीड शहरात २०० कोटींचे स्टेडियम उभारणार असल्याचा दावा केलेला असून ज्या वक्फबोर्डने २०० कोटींचे स्टेडियम उभारण्याचा दावा केला त्या वक्फबोर्डला स्वत:च्या कार्यालयाच्या जागेसाठी नगरप्रशासनासमोर हात पसरविण्याची वेळ आलेली दिसून येत आहे. बीड शहरात स्टेडियम होणे ही विकासात्मक बाब असली तरी वक्फबोर्डने स्वत: च्या कार्यालयासाठी जागेची मागणी करावी हे कितपत योग्य आहे.

सध्या वक्फबोर्डचे कार्यालय शहेंशाहनगर परिसरात भाड्याच्या जागेवर सुरू आहे. वक्फबोर्डचे चेअरमन हे वक्फबोर्ड मेंबर असताना लवकरच वक्फबोर्ड कार्यालयाची इमारत बांधणार असे आश्वासन देवून बातमीच्या माध्यमातून अनेक वेळा याला प्रसिद्धीही मिळाली आहे. त्यानंतर बीड शहरात मेडिकल कॉलेज वक्फबोर्डच्या जागेत उभारणार याची घोषणा करूनही बरेच दिवस झालेत, वक्फबोर्ड कार्यालयाची इमारत, वक्फबोर्डच्या जागेत मेडिकल कॉलेज याच्या प्रतीक्षेत नागरिक असतानाच आता पुन्हा बीड शहरात दोनशे कोटीचे स्टेडियम वक्फबोर्डच्या जागेत उभारणार असल्याची घोषणा करण्यात आली. सध्या बीडचा विकास वक्फबोर्डच्या माध्यमातून कागदोपत्री सुरू असून किमान वक्फबोर्डने इतर दिलेले आश्वासन पूर्ण केले नसले तरी स्वत:च्या कार्यालयाची इमारत स्वत:च्या जागेवर उभी करावी अशी बीडकरांची इच्छा आहे परंतु वक्फबोर्ड मंडळ स्वत:च्या कार्यालयाच्या जागेसाठी नगरप्रशासनाकडे जागेची मागणी करतेय हे नवलच म्हणावे लागेल.

### जामा मस्जिदच्या अशुरखाना जागेवर अतिक्रमण करून बांधलेल्या इमारतीत वक्फबोर्ड कार्यालय सुरू करा

**अनेक इनामी जमिनीवर भूमाफियांनी कब्जा करून त्या जमिनी प्लॉटिंग करून विकलेल्या आहेत. तसेच काहींनी अतिक्रमण करून वक्फबोर्डच्या जमिनी हडप केलेल्या आहेत. शहरातील किल्लामैदान परिसरात तर चक्क एका शिक्षणसंस्थेने जामा मस्जिदच्या जागेवर अतिक्रमण करून त्याठिकाणी भव्यदिव्य इमारत बांधली आहे. विशेष म्हणजे ती इमारत बांधताना संबंधित शिक्षणसंस्थेने कोणाचीही परवानगी घेतलेली नाही. सदरील जागा जामा मस्जिद अशुरखान्याची असून वक्फमंडळाने अशा अनाधिकृत इमारती ताब्यात घेवून त्याठिकाणी स्वत:चे कार्यालय सुरू करावे जेणेकरून वक्फमंडळाला नगरप्रशासनाकडे जागेसाठी मागणी करण्याची गरज पडणार नाही.**

# नेकनूर ग्रामपंचायतने दोन लाख रुपये एजन्सीच्या अकाउंटवर टाकले ते दोन लाख रुपये कोणत्या कामाचे?

## सीईओ रहेमान यांनी त्या एजन्सीने केलेल्या कामाचे वर्कऑर्डर तपासण्याची गरज

बीड । दिव्य रिपोर्टर

१५ वित्त आयोगाच्या निधीत मोठ्या प्रमाणात नेकनूर ग्रामपंचायतमधून भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तक्रारीच्या अनुषंगाने फक्त चौकशी समिती स्थापन होते परंतु चौकशी मात्र पूर्ण होत नाही म्हणून झालेल्या भ्रष्टाचारावर पडदा टाकण्याचे षडयंत्र असल्याचे दिसून येत असून आता या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी लक्ष देण्याची गरज भासत आहे. विशेष म्हणजे नेकनूर ग्रामपंचायतचे उपसरपंच यांनी याविषयी तक्रार दिलेली

### चौकशी समितीकडून चौकशी करण्यास टाळाटाळ

**तत्कालीन बीडीओ वानखेडे यांनी नेकनूर ग्रामपंचायत अंतर्गत झालेल्या कामाची चौकशी करण्यासंदर्भात चौकशी समिती स्थापन केली होती. चौकशी समिती स्थापन झाल्यानंतर चौकशी समितीने ही चौकशी करण्यासाठी तब्बल एक महिना लावला. एक महिन्यानंतर ही चौकशी करताना संबंधित ग्रामपंचायत अधिकारी नागरे यांनी चौकशीकामी लागणारे कागदपत्रे उपस्थित करून दिली नसल्याने चौकशी अर्ध्यावरच थांबली. त्यानंतर ही चौकशी आम्ही पुन्हा करू असे सांगण्यात आले. ज्याअर्थी संबंधित एजन्सीने मी काम केलेले नसताना नेकनूर ग्रामपंचायतने माझ्या अकाउंटवर दोन लाख रुपये कशाचे टाकले? हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. याचा अर्थ १५ वित्त आयोगाच्या निधीतून भ्रष्टाचार झाल्याचे स्पष्ट दिसून येते तर मग चौकशी समिती पुन्हा चौकशी करण्यासाठी का टाळाटाळ करत आहे? याचाही सीईओ रहेमान यांनी पाठपुरावा करणे गरजेचे आहे.**

### नेकनूर ग्रामपंचायत अंतर्गत मोठ्या प्रमाणात बोगस कामे झाल्याचा संशय

### मागील तीन वर्षांचा आढावा घेण्याची गरज

असतानाही जर चौकशी होत नसेल तर प्रशासनच प्रशासनाचा गेम करत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे १५ वित्त आयोगाच्या निधीतून कामे न करता कागदोपत्री कामे दाखवून एका एजन्सीच्या अकाउंटवर दोन लाख रुपये नेकनूर ग्रामपंचायतच्या जबाबदारांनी टाकले. संबंधित एजन्सीने ▶▶ पान २ वर...

# राष्ट्रध्वज काढून घेवून जाणाऱ्या त्या दोघा अज्ञातांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची गरज

## त्या शाळेतील मुख्याध्यापक व जबाबदार शिक्षकांवर कारवाईसाठी विलंब का? १ मे महाराष्ट्रदिनी नामलगाव येथील प्राथमिक शाळेत झालेला प्रकार

बीड । दिव्य रिपोर्टर

नियमाने १ मे रोजी शाळेत राष्ट्रध्वज फडकावून महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. परंतु दोघा अज्ञात व्यक्तींनी तो राष्ट्रध्वज काढून घेवून गेल्यानंतर एकच खळबळ उडाली. हा प्रकार नामलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत घडला असून याप्रकरणी आतापर्यंत कोणावरच कारवाई झालेली नाही. अशाप्रकारे राष्ट्रध्वज काढून घेवून जाणे हा अत्यंत गंभीर प्रकार सून राष्ट्रध्वज काढून घेवून जाणाऱ्या त्या दोघा अज्ञाताविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करणे गरजेचे आहे. तसेच शाळेतील जबाबदार मुख्याध्यापक व जबाबदार शिक्षक यांच्यावरही कारवाई करणे अपेक्षित असताना फक्त हे प्रकरण कागदोपत्रीच सुरू असल्याने शिक्षणविभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या घटनेची सविस्तर माहिती अशी की, नामलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १ मे रोजी राष्ट्रध्वज फडकाविण्यात आले. नियमाने राष्ट्रध्वज फडकाविल्यानंतर शाळा प्रशासनाचे जबाबदार जोपर्यंत राष्ट्रध्वज खाली उतरवित नाहीत तोपर्यंत शाळेत उपस्थित राहतात. नियमाने शाळेतील जबाबदार व्यक्ती त्याठिकाणी उपस्थितही होते परंतु सायंकाळच्या वेळी अचानक दोघेजण वाहनातून आले, त्यावेळी राष्ट्रध्वजची देखभाल करणारे शिक्षक शौचालयासाठी गेले होते. याचाच फायदा घेत त्या दोघा अज्ञातांनी फडकाविलेला राष्ट्रध्वज काढून त्याठिकाणावरून पळ काढला. ही बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास आल्यानंतर तेथील समाजसेवक परशुराम गुडे व मुकूंद शेळके यांनी याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना तक्रार देवून याप्रकरणी कारवाईची मागणी केली. तसेच गुडे व शेळके यांच्या तक्रारी अर्जाची दखल घेत त्याठिकाणी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी भेट देवून पंचनामाही केला. पंचनाम्यात वरील प्रकारे ▶▶ पान २ वर...

### त्या दोघांवर देशद्रोहचा गुन्हा दाखल करून संबंधित जबाबदारांवर निलंबनाची कारवाई करा

**फडकाविलेले राष्ट्रध्वज काढून घेवून जाणे हा एकाप्रकारे देशद्रोहाचा गुन्हा आहे. तसेच राष्ट्रध्वज फडकाविलेल्या ठिकाणी शाळा प्रशासनाचे जबाबदार शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यावरही कारवाई होणे अपेक्षित आहे. यात महत्त्वाचे म्हणजे १ मे रोजी घडलेली ही गंभीर घटना असून संबंधित शाळा प्रशासनाने सर्वप्रथम त्या दोघा अज्ञातांवर देशद्रोहचा गुन्हा दाखल करून घेण्याची गरज होती. त्याशिवाय शिक्षणविभागाने जबाबदारांवर कारवाई करण्याची गरज होती. परंतु दोन महिने झाले तरी अद्यापपर्यंत कोणावरही कारवाई झाली नसल्याने तक्रारदार आक्रमक झाले असून जर याप्रकरणी शिक्षणविभागाने दुर्लक्ष केले तर तक्रारदार आंदोलनाच्या पवित्र्यात दिसून येत आहेत.**



### तक्रारदारांना कोणतीही कल्पना न देता घटनेचा पंचनामा

**नामलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १ मे रोजी झेंडा चोरी गेल्याची तक्रार तक्रारदाराने केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी संबंधित घटनेचा पंचनामा करण्याचे आदेशित केले होते. त्या दृष्टीकोनातून शिक्षणविभागातील काही अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येवून पंचनामा केला. नियमाने सदरील पंचनामा हा तक्रारदारासमोर करणे अपेक्षित होते परंतु तक्रारदारांना पंचनाम्याच्या वेळी डावलण्यात आले. त्यामुळे तक्रारदारांना संशय निर्माण झाला असून सदरील पंचनामा बोगस चुकीचा असल्याचा आरोपही तक्रारदाराने केला असून ज्याअर्थी जिल्हा परिषद सीईओ यांनी संबंधितांवर कारवाई करण्यासंदर्भात पत्रव्यवहार केला आहे तर मग शिक्षणविभागाने आतापर्यंत जबाबदार मुख्याध्यापक किंवा शिक्षकांवर कारवाई का केली नाही? असाही प्रश्न उपस्थित होत असून अशा बेजबाबदार शिक्षकांना पाठिशी घालणाऱ्या शिक्षणविभागातील जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची गरज आहे.**

# जुन्या पिढीचा इतिहास नवीन पिढीला दिशादर्शक -जिल्हाधिकारी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मान पत्र देऊन कार्याचा गौरव; बीड जिल्ह्यातील कारावास भोगलेल्या ५७ ज्येष्ठांचा सन्मान

बीड । दिव्य रिपोर्टर

**लोकशाही मूल्ये, अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी झटलेल्या सर्व जुन्या पिढीचा इतिहास नवीन पिढीला दिशादर्शक आहे. आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या सर्व ज्येष्ठांच्या पाठिशी शासन खंबीरपणे सोबत आहे. आपणास पात्र असलेल्या सर्व सेवा प्रशासनाकडून तत्परतेने देण्यात येतील, असा विश्वास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज उपस्थितांना दिला.**

जिल्हाधिकारी कार्यालयात आणीबाणीच्या काळात लोकशाहीकरिता लढा देताना सामाजिक व राजनैतिक कारणासाठी कारावास भोगलेल्या बीड जिल्ह्यातील ५७ जणांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्वाक्षरी असलेले सन्मान पत्र जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याहस्ते आज सन्मानपूर्वक देण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, कारावास भोगलेले विजयकुमार पालसिंगलकर आदींची मंचावर उपस्थिती होती.





१९७५ ते १९७७ काळात लागू केलेल्या आणीबाणीच्या काळात भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी व मुल्याच्या जपणुकीसाठी अत्यंत कठोर परिस्थितीत निडरपणे उभे राहिलात. आपण हुकुमशाहीचा धाडसाने प्रतिकार करून, कारावास स्वीकारून स्वातंत्र्य अभिव्यक्ती आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी संघर्ष केला. देशाच्या लोकशाही परंपरेचे रक्षण करण्याच्या या लढ्यातील आपल्या योगदानाचा आम्ही अभिमानाने गौरव करीत आहोत. हे सन्मान पत्र आपल्या त्याग, धैर्य आणि दृढतेला सलाम करण्यासाठी आहे. आपण आपल्या कृतीतून विचारांतून आणि त्यागातून नव्या पिढीसमोर लोकशाही मुल्यांचा आदर्श ठेवला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन्मान पत्रात नमूद केले आहे.

प्रातिनिधिक स्वरूपात श्री. पालसिंगलकर, कुसुम सरवदे, उद्धव नागरगोजे, नारायण पांडे, दिलीप सोनवळकर, श्रीमती संजीवनी जोगदंड यांना जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या हस्ते सन्मान पत्र देण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनी सन्मान पत्राचे वाचन केले. तसेच उपस्थित सर्वांचे आभार मानले.

पान १ वरून

### लिफ्टच्या कामाची गुणवत्ता

इस्टिमेटमध्ये घोळ झाल्याचा संशय असून पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी या प्रकरणाची आपल्या स्तरावर चौकशी लावण्याची मागणी होत आहे. तसेच जोपर्यंत लिफ्टच्या फाऊंडेशनच्या कामाची गुणवत्ता तपासणी होत नाही आणि जोपर्यंत इस्टिमेटची तपासणी होत नाही तोपर्यंत संबंधित गुत्तेदाराला बिले देण्यात येवू नये अशीही मागणी होत आहे. तसेच या कामासाठी इस्टिमेट तयार करणारे स्थापत्य अभियंता व विद्युत अभियंता या दोघांचीही विभागीय चौकशी करणे गरजेचे असून जास्तीचे इस्टिमेट तयार करून शासनाची फसवणूक करण्याचे हे षडयंत्र असल्याचीही शंका व्यक्त केली जात आहे.

सध्या वाळूचा तुटवडा असल्याने बांधकामासाठी खडी-कचचा वापर करण्यासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. खडी-कचचा वापर करताना वापरात घेणारी कच धुवून त्या कचचा वापर करणे बंधनकारक आहे परंतु संबंधित गुत्तेदाराने बुकट्यासह कचचा वापर केल्याचे दिव्य आधारने चित्रीकरण करून यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना याची माहिती दिलेली असतानाही संबंधितांनी याकडे दुर्लक्ष केल्याने लिफ्टच्या फाऊंडेशनच्या कामात तफावत झाल्याचे दिसून येत असल्याने या कामाची गुणवत्ता तपासणी करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता तोंडे यांनी फाऊंडेशनच्या कामाची गुणवत्ता तपासणी करण्याचे फक्त आश्वासन दिले होते. परंतु फाऊंडेशनच्या कामाची आतापर्यंत गुणवत्ता तपासणी झालेली नाही. तसेच लिफ्ट बसविण्याच्या कामासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर आहे. दिव्य आधारच्या प्रतिनिधीने एका लिफ्ट टेक्निशियनसोबत चर्चा करून पाच माणसांची लिफ्ट बसविण्याकामी किती खर्च येणार याची विचारणा केल्यानंतर संबंधित टेक्निशियनने स्पष्ट सांगितले की, पाच माणसाच्या लिफ्टसाठी सात ते आठ लाख रुपये खर्च येणार, वायरिंग आणि लायटिंगचा खर्च आपल्या स्तरावर करावा लागेल. त्या दृष्टीकोनातून विचार केला तरदोन लाख रुपये इतर खर्च धरून एकूण पाच माणसांच्या एका लिफ्टसाठी दहा लाख रुपयांचा खर्च होवू शकतो. न्यायालय परिसरात बसविण्यात येणारी लिफ्ट दहा माणसांची असेल तर आपण एका लिफ्टसाठी २० लाख रुपये खर्च धरू, दोन लिफ्टचे ४० लाख रुपये खर्च धरला तरी मग ५० लाखांचे इस्टिमेट सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाच्या अभियंत्यांनी का तयार केले? यातून संशय निर्माण झाला असून लिफ्टच्या फाऊंडेशनचे काम व लिफ्ट बसविण्याच्या कामाच्या इस्टिमेटची चौकशी करणे गरजेचे वाटत आहे.

### नेकनूर ग्रामपंचायतने दोन

हे दोन लाख रुपये माझ्या अकाउंटवर कोणत्या कामाचे टाकले? असा प्रश्नही उपस्थित केलेला आहे, हे सर्व काही स्पष्ट असताना या बाबीकडे बीडीओ का दुर्लक्ष करत आहे? याचीही चौकशी होणे गरजेचे वाटते.

नेकनूर ग्रामपंचायत अधिकारी यांनी ग्रामपंचायतमधील काही सदस्यांच्या संगनमताने १५ वित्त आयोगाच्या निधीत घोळ घालून कोणतीही कामे न करता दोन लाख रुपये एका एजन्सीच्या अकाउंटवर टाकले. आपल्या अकाउंटवर आलेले दोन लाख रुपये कोणत्या कामाचे आहे? हा प्रश्न संबंधित एजन्सीनेच उपस्थित करून नेकनूर ग्रामपंचायतला पत्रव्यवहार करून हे दोन लाख रुपये कोणत्या कामाचे माझ्या अकाउंटवर टाकल्याचा जवाब विचारलेला आहे. या प्रकरणी नेकनूर ग्रामपंचायत अधिकारी नागरे यांनी दिव्य आधारची भेट घेवून सदरील काम संबंधित एजन्सीने केल्याचे सांगितले. जर हे काम संबंधित एजन्सीने केलेले आहे तर जिल्हा परिषद सीईओ जितिन रहेमान यांनी संबंधित ग्रामपंचायत अधिकारी नागरे यांच्याकडून त्या एजन्सीने केलेल्या कामाचे वर्कऑर्डर मागवून त्याची पाहणी करणे गरजेचे वाटत आहे.तसेच नेकनूर ग्रामपंचायत अंतर्गत १५ वित्त आयोग व जनरल निधीतून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा संशय असून सीईओ यांनी आपल्या स्तरावर या प्रकरणाची चौकशी करणे गरजेचे आहे.

### त्या क्लासेसची

यांनी पोलीस प्रशासनाला दिले. पोलीस ज्या पद्धतीने हा तपास करत आहेत त्या पद्धतीने आरोपीला शिक्षा होईल असे वाटत नाही त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी महिला आयपीएस अधिकार्यामार्फत एसआयटी गठीत करून व्हावी अशी मागणी आपण मुख्यमंत्र्यांकडे व दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांकडे करणार आहोत असेही आ.मुंडे म्हणाले.तत्पूर्वी मुंडे यांनी पोलीस अधीक्षक नवनीत तसेच या प्रकरणात नियुक्त तपास अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा करून सुरू असलेल्या तपासाची चौकशी केली. अशा नीच वृत्तीच्या लोकांनी असे किती गुन्हे याआधी केलेत तेही उघड होऊन यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, तसेच खाजगी कोचिंग क्लासेस चालकांना फी वसुली सह सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून एक संहिता लागू असावी, याबाबत आपण प्रयत्न करणार असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, फारुक पटेल, ड. गोविंद फड, दादासाहेब मुंडे, भागवत तावरे, यांसह याप्रकरणी आंदोलन पुकारलेले पालक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

### राष्ट्रध्वज काढून घेवून

घटना घडली असल्याचे स्पष्ट सांगण्यात आले. परंतु हे प्रकरण अत्यंत गंभीर असल्याने तात्काळ कारवाई करणे अपेक्षित होते परंतु शिक्षणविभागाने या प्रकरणाला फक्त कागदोपत्रीच नोंदी घेतले असल्याचे दिसून येत असून सीईओ जिल्हा परिषद यांनी याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेशित केल्यानंतरही अद्यापपर्यंत कारवाई झाली नाही. आता तरी शिक्षणविभाग दोषींवर कारवाई करणार का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## मार्कमेमो, टी.सी.हरवला आहे

वीर विश्वजीत विष्णू या नावाचे कागदपत्र असलेली कॅरिबॅग मोटारसायकल वरून पडली आहे. ज्यामध्ये खालील कागदपत्रे होते.

१) इयत्ता १० वी चा मार्कमेको २) १२ वी चा टीसी व मार्कमेमो ३) आधारकार्ड आणि झेरॉक्स हरवले आहेत.

ज्यांना सापडतील त्यांनी खालील फोनवर संपर्क करावा.

वीर विष्णू किसनराव-९८२२६६५०१६

# गुलाम साकिब एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, ज्यांच्या लेखनातून वाचकाला जवळीक जाणवते: न्यायमूर्ती डॉ. ख्वाजा फारूक अहमद

## तरुण लघुकथाकार आणि कवी गुलाम साकिब यांना डॉ. अब्दुल कादिर फारुकी राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

बीड । दिव्य रिपोर्टर

भारतीय उर्दू विकास फाउंडेशन, सोलापूर यांच्या वतीने आज उर्दू प्रेमी शेख मुख्तार कॉन्ट्रॅक्टर यांच्या 'मुहिब उर्दू हॉल' येथे आयोजित एक भव्य मुस्लिम विचारवंतांच्या समारंभात, तरुण कवी आणि लेखक गुलाम साकिब (शेख अब्दुल रहीम मुहिउद्दीन), उर्दू कनिष्ठ महाविद्यालय, बीड येथील उर्दू शिक्षक यांना त्यांच्या साहित्यिक सेवांच्या सन्मानार्थ अमेरिकेतील उर्दू लेखक डॉ. अब्दुल कादिर फारुकी राष्ट्रीय उर्दू पुरस्कार प्रदान करण्यात आला. भाषाशास्त्रज्ञ आणि उर्दू प्रेमी व्यक्तिमत्त्व, न्यायमूर्ती डॉ. ख्वाजा फारूक अहमद (सत्र न्यायाधीश, परंडा, जिल्हा उस्मानाबाद) यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी न्यायमूर्ती ख्वाजा फारूक अहमद म्हणाले की, गुलाम साकिब यांचे साहित्य हे जीवनातील अनुभवांचे आणि सुधारणेसाठी केलेल्या टीकेचे प्रतिबिंब आहे. ते म्हणाले की, गुलाम साकिब हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहेत; ते एकाच वेळी लेखक, सूत्रसंचालक, पत्रकार आणि शिक्षक आहेत. त्यांच्या 'किरदार' या लघुकथा संग्रहाचे वाचन केल्यानंतर मला हे सांगावेच लागेल की त्यांच्या लेखनात वाचकाला जवळीक जाणवते, कारण त्यांची नजर समाजाच्या प्रत्येक भागावर आणि बदलांवर आहे. गुलाम साकिब यांनी स्वतःचा वापर होण्यापासून वाचावे आणि शक्यतो संक्षिप्तता स्वीकारावी, जास्त अपेक्षा ठेवू नयेत, जेणेकरून अपेक्षा भंग होण्याची भीती राहणार नाही.

तत्पूर्वी, भारतीय उर्दू विकास फाउंडेशन, सोलापूरचे अध्यक्ष, प्रतिष्ठित लघुकथाकार आणि साहित्यिक सुलतान अख्तर यांनी प्रास्ताविक आणि कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. ते म्हणाले की, डॉ. अब्दुल कादिर फारुकी, न्यूयॉर्क, अमेरिका येथून उर्दू भाषिकांचे संरक्षण आणि प्रोत्साहन करत आहेत. त्यांनी प्रामाणिक प्रयत्न करून अनेक महत्त्वाच्या उर्दूच्या प्रामाणिक सेवा करणाऱ्या उर्दू लेखकांना पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. याप्रसंगी, भारतीय उर्दू विकास फाउंडेशन, सोलापूर गुलाम साकिब यांच्या या राष्ट्रीय पुरस्कारासाठीच्या सेवांचा सन्मान करत आहे. गुलाम साकिब यांनी ९ पुस्तके लिहिली आहेत. ते एक चांगले लघुकथाकार, कवी, साहित्यिक, समीक्षक, समालोचक आणि रेखाचित्रकार आहेत. त्यांना हा पुरस्कार प्रदान करताना आम्हाला अभिमान वाटतो.



सोलापूर येथून ज्येष्ठ पत्रकार आणि शिक्षणतज्ज्ञ अयुब निलमंदू म्हणाले की, गुलाम साकिब यांच्याशी विशेष आपुलकी आहे आणि आम्हा सर्वांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव जाणवतो. त्यांचे साहित्य परिचयाचे मोहताज नाही.

गुलबर्गा येथील प्रसिद्ध विनोदी लेखक आणि जागतिक साहित्यिक मंजूर वकार म्हणाले की, गुलाम साकिब हे एक अनुभवी आणि प्रतिभावान कलाकार आहेत. त्यांची कला मनावर परिणाम करते.

औरंगाबाद येथील कुशल लेखक श. शकील म्हणाले की, गुलाम साकिब हे एक चांगले लेखक आणि रेखाचित्रकार आहेत. ते अतिशय वेगाने साहित्याची दर्जेदार सेवा करत आहेत.

याप्रसंगी, मलीया वरिष्ठ महाविद्यालय, बीड येथील उपप्राचार्य प्राध्यापक डॉ. शौकतउल्लाह हुसैनी म्हणाले की, गुलाम साकिब हे एक नेक आणि प्रामाणिक तरुण आहेत. त्यांनी शॉर्टकट न अवलंबता केवळ आपल्या कामावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यांच्यात साधेपणा आणि नम्रता आहे. ते आपल्या लोकांवर प्रेम करतात.

मलीया वरिष्ठ महाविद्यालय, बीड येथील इंग्रजी विभागाचे प्रमुख प्राध्यापक अब्दुल अनिस अब्दुल रशीद यांनी आपली आंतरिक बांधिलकी व्यक्त करताना सांगितले की, गुलाम साकिब माझे विद्यार्थी आहेत, परंतु आम्हीही त्यांच्याकडून खूप काही शिकत आहोत. ते म्हणाले की, साकिब लोकांना आपलेसे करण्यात निष्णात आहेत. साकिब आपल्या कामाचे दिवाने आहेत.प्राध्यापक सय्यद फरीद अहमद नहरी म्हणाले की, गुलाम साकिब कधीही कोणत्याही चांगल्या कामासाठी नकार देत नाहीत, कितीही मोठी अडचण असली तरी; हेच त्यांचे वैशिष्ट्य आहे. मी त्यांना त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन करतो आणि त्यांच्यासाठी नेहमी प्रार्थना करतो.

साहित्यिक तज्ज्ञ, मुख्य संपादक जमाल नदीम आणि 'शहरनामा' चे हजरत नदीम मिर्झा म्हणाले की, गुलाम साकिब यांनी स्वतःला ओळखले आहे. या प्रवासात त्यांना आपले आणि परके ओळखता आले. त्यांना आस्तीनच्या सापांनी दंश केला आहे; त्यांना त्यांच्यापासून सावध राहण्याची गरज आहे.

मराठी-हिंदी कवी प्राध्यापक डॉ. जोशी म्हणाले की, गुलाम साकिब हे शब्दांनी सर्वांना आपलेसे करणारे आणि कार्यक्रमावर छाप पाडणारे कवी आणि सूत्रसंचालक आहेत. ते एक हिरा आहेत.

मराठी कवी श्री. सादुलकर सर म्हणाले की, गुलाम साकिब यांनी शब्दांनी सर्वांना आपलेसे केले आहे; ते लोकांच्या हृदयावर राज्य करतात.सामाजिक कार्यकर्ते अनवर पाशा म्हणाले की, गुलाम साकिब पाण्यासारखे आहेत, जे कोणताही रंग स्वतःमध्ये स्वीकारण्याची क्षमता ठेवतात.जमियत उलेमा नेते मुझ्तबा खान सर म्हणाले की, गुलाम साकिब यांनी चांगल्या कामांमध्ये नेहमी सक्रिय राहण्याची इच्छा बाळगली आहे.पत्रकार आणि लेखक जावेद पाशा सर म्हणाले की, गुलाम साकिब अभिनंदनास पात्र आहेत आणि या पुरस्काराचे खरे हकदार आहेत.शैक्षणिक आणि सामाजिक कार्यकर्ते शेख कलाम सर म्हणाले की, गुलाम साकिब यांच्यासारख्या समाज आणि राष्ट्राच्या संपत्तीचे जतन आणि संरक्षण केले पाहिजे, जेणेकरून पुढील पिढ्यांना त्यांचा फायदा घेता येईल.

काझी मुजीबुर्रहमान म्हणाले की, मुश्ताक अहमद अन्सारी आणि गुलाम साकिब हे खरे जौहरी आहेत, ज्यांनी त्यांचे महत्त्व ओळखले आणि त्यांना आपलेसे केले.

इलियास इनामदार म्हणाले की, गुलाम साकिब यांचे महत्त्व ओळखले पाहिजे; त्यांना पुरस्कार मिळाल्याने बीडवासीयांना अभिमान वाटत आहे.

उर्दू क्लबचे अध्यक्ष मोमिन इसहाक सर म्हणाले की, गुलाम साकिब हे समाजाचे दुःख जाणणारे तरुण आहेत; त्यांना सर्व प्रकारे मदत केली पाहिजे आणि त्यांचे महत्त्व ओळखले पाहिजे. ते निस्वार्थपणे उर्दू आणि समाज-राष्ट्राची सेवा करत आहेत.

डॉ. इम्रान खान, प्राचार्य शाहीन अकादमी, म्हणाले की, जर गुलाम साकिब यांनी ढोंग आणि राष्ट्रविक्रीचा मार्ग स्वीकारला असता, तर ते आज महालात राहिले असते. त्यांनी त्यांच्यावर एक वास्तववादी कविता सादर केली, जी खूप पसंत केली गेली.

उर्दू प्रेमी हुसेन अख्तर म्हणाले की, त्यांना उर्दू अकादमीचा पुरस्कार दिला पाहिजे.

भाषाशास्त्रज्ञ आणि उर्दू प्रेमी न्यायमूर्ती डॉ. ख्वाजा फारूक अहमद (सत्र न्यायाधीश, परंडा, उस्मानाबाद), शिक्षणतज्ज्ञ मुश्ताक अहमद अन्सारी (सचिव, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, बीड), मंजूर वकार (प्रसिद्ध जागतिक लेखक आणि विनोदी लेखक, गुलबर्गा), प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि ज्येष्ठ पत्रकार अयुब निलमंदू (सचिव, शमा उर्दू स्कूल, सोलापूर), प्रसिद्ध साहित्यिक श. शकील (औरंगाबाद), सुलतान अख्तर (अध्यक्ष, भारतीय उर्दू विकास फाउंडेशन), शेख मुख्तार कॉन्ट्रॅक्टर (उर्दू प्रेमी), मुजीब खान सर (स्पोर्ट्स कोच, गुलबर्गा), हजरत नदीम मिर्झा (मुख्य संपादक, 'शहरनामा' आणि 'जमाल नदीम', बीड), अर्शद सिद्दिकी (अध्यक्ष, बझ्म-ए-अहबाब-ए-उर्दू, बीड), मुझ्तबा अहमद खान सर (जमियत उलेमा नेते, बीड), डॉ. शौकतउल्लाह हुसैनी (उपप्राचार्य, मलीया वरिष्ठ महाविद्यालय, बीड), प्राध्यापक सय्यद फरीद अहमद नहरी (विभागप्रमुख, उर्दू विभाग, मलीया वरिष्ठ महाविद्यालय, बीड), प्राध्यापक अब्दुल अनिस (विभागप्रमुख, इंग्रजी विभाग, मलीया वरिष्ठ महाविद्यालय), डॉ. झुबैर हुसैनी (प्राचार्य, के.एस.के. फूड टेक्नॉलॉजी कॉलेज, बीड), रईस खान (पत्रकार आणि मुख्य संपादक, 'महा टाइम्स'), डॉ. इम्रान खान (प्राचार्य, शाहीन अकादमी, बीड), ज्येष्ठ पत्रकार आणि उर्दू प्रेमी सय्यद फारूक अहमद कादरी, असलम अनवरी (सचिव, मन्सूर शाह वली रह. स्कूल), सज्जाद अहमद खान सर (प्राचार्य, इंदिरा गांधी मेमोरियल ज्युनियर कॉलेज, बीड), हाजी सय्यद अतीक अहमद सर (मुख्याध्यापक, पीपल्स उर्दू प्रायमरी स्कूल, बीड), सय्यद समीउद्दीन सर (मुख्याध्यापक, एम.के. उर्दू स्कूल, रायेमोहा), सय्यद लाईक अहमद सर, सामाजिक आणि शैक्षणिक नेते कलाम सर (हजरत बाले पीर रह. स्कूल, बीड), उर्दू क्लबचे नेते मोमिन इसहाक सर (जिल्हा परिषद शिक्षक प्रशिक्षक), डॉ. जोशी (के.एस.के. होमिओपॅथी कॉलेज, बीड), कवी श्री. सादुलकर सर, उर्दू प्रेमी हुसेन अख्तर (राष्ट्रीय अध्यक्ष, तन्झीम तरक्की उर्दू), काझी मुजीबुर्रहमान (अध्यक्ष, मौलाना आझाद विचार मंच), अभियंता अझहर इनामदार सर (अध्यक्ष, अल-खैर फाउंडेशन, बीड), जावेद पाशा सर (सदस्य, बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशन आणि प्रसिद्ध पत्रकार), अदनान खान सर (कार्यकारी संपादक, 'रोजनामा बीड किसान'), शेख अयुब सर, मोमिन जावेद सर, प्राध्यापक इलियास इनामदार (अलसीना संस्थापक अध्यक्ष), शेख अझीम शेख इब्राहिम, कवी अभियंता रिजवान नाथापुरी, शिक्षक नेते आणि कवी असिफ आलम, मिन्हाज खान, ऐजाझ खान सर, झरताज खान सर, काझी रिजवान सर (हजरत बाले पीर स्कूल), अहमद ओवैस सर, नजीब बेग सर, ईसा खान (सामाजिक कार्यकर्ते), अनवर पाशा (सामाजिक कार्यकर्ते), सय्यद आतिफ खतीब अल-खैर, आमिर खान अयुब खान अल-खैर, शफीक फारुकी, काझी सय्यद अझीम अभियंता अल-खैर, असिफ सर (डी.पी.एस. स्कूल), शेख रबी (गुलाम साकिब यांचा मुलगा), शेख शफान आरिफ (गुलाम साकिब यांचा मुलगा), शेख तलहा (अझीम यांचा मुलगा) यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उर्दू प्रेमी शेख मुख्तार कॉन्ट्रॅक्टर, झाहेद हुसेन सर (मुख्याध्यापक, मिल्लत ग्रुप ऑफ स्कूल्स, बीड), आफरिन झाहेद हुसेन मॅडम (प्राचार्या, मिल्लत इंग्लिश स्कूल), रिजवान खान दद्दू, सय्यद सैफ अली युसूफ अली (एम.डी., साया एज्युकेशन, बीड), हुसेन खान मोहसिन खान दुर्रानी, अरहम साबरी, अर्सल साबरी यांनी खूप प्रयत्न केले.गुलाम साकिब यांनी आभार मानले आणि म्हणाले की, आपल्या सर्वांची उपस्थिती हीच माझी खरी संपत्ती आहे. ज्या व्यक्तीकडे तुमच्यासारखे मौल्यवान आणि प्रामाणिक मित्र असतील, तो सर्वात श्रीमंत माणूस आहे. न्यायमूर्ती ख्वाजा फारूक अहमद यांच्या भाषणातील प्रत्येक शब्द माझ्यासाठी पुरस्कारापेक्षा कमी नाही. सुलतान अख्तर आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचा मी आभारी आहे की त्यांनी मला पुरस्कार देऊन प्रोत्साहन दिले.

# किरणसेठ अडकले आणि मुख्य सुत्रधार वाचला

### ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील लाच प्रकरणाला वेगळे वळण लागण्याची शक्यता

## दोघा आरोपींना न्यायालयीन कोठडी, तिसरा कोण?

### त्या विश्वासूचा मोबाईल बंद

लाचेत एक कर्मचारी अन् एक अधिकारी अडकल्याची माहिती मिळताच आंधळे यांच्यासोबत असणारा त्या विश्वासूचा मोबाईल बंद झाला. मिळालेल्या माहितीनुसार तो विश्वासू अद्यापपर्यंत कार्यालयातही आला नसल्याची माहिती मिळाली असून लाचलुचपत विभागाने त्या विश्वासूला ताब्यात घेवून त्याची कसून चौकशी केली तर आतापर्यंत झालेल्या भ्रष्टाचाराला मोठी वाचा फुटणार यात काही शंका नाही.

बीड । दिव्य रिपोर्टर

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व वरिष्ठ सहाय्यक हे ८० लाख रुपयांची लाच स्विकारताना लाचलुचपत विभागाने त्यांना रंगेहात पकडले. पिंपळवंडी ता.पाटोदा येथील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन योजनेअंतर्गत भूमिगत नालीचे काम पूर्ण झाल्याने अंतिम बिलाचे नोट शिटवर सही करून वरिष्ठांकडे अंतिम बिल मंजूरीसाठी पाठविण्यासाठी ही लाच मागितली असल्याची माहिती मिळाली असून सदरील घटना घडल्यानंतर वरिष्ठ सहाय्यक यांनी ही लाच स्वीकारली. परंतु दररोज कार्यकारी अभियंता यांच्यासोबत राहणारा मुख्य सुत्रधार यातून वाचला असल्याची चर्चा जोरात असून कार्यकारी अभियंता व वरिष्ठ सहाय्यक या दोघांना न्यायालयीन कोठडी झाली असून जर लाचलुचपत विभागाने पारदर्शक पाठपुरावा केला तर तिसरा आरोपी कोण? याचाही खुलासा होवू शकतो.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मुकूंद आंधळे यांनी वरील कामासाठी ८० लाख रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने या प्रकरणी लाचलुचपत विभागाला तक्रार केल्यानंतर बुधवारी दि.२५ जून रोजी लाचलुचपत विभागाने ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद कार्यालयात सापळा लावला. तक्रारदार लाचेचे पैसे देण्यासाठी ज्यावेळी मुकूंद आंधळे यांच्या कॅबिनला गेल्यानंतर आंधळे यांनी वरिष्ठ सहाय्यक किरण हिवाळे यांना किरणसेठ असे संबोधून संबंधितांचा काम मार्गी लावून टाका असे सांगितल्यानंतर किरण यांनी लाचेची रक्कम स्विकारली. त्याचवेळी लाचलुचपत विभागाने दोघांनाही ताब्यात घेतले. परंतु कार्यकारी अभियंता यांचा विश्वासू कर्मचारी जो की, दररोज आंधळे यांच्यासोबत असायचा. परंतु नशीब बलवान असल्यावर काही पण शक्य आहे असेच झाले. किरणसेठ अडकले आणि मुख्य सुत्रधार वाचला अशी ग्रामीण पाणीपुरवठा विभागात जोरदार चर्चा असून लाचलुचपत विभागाने हा तिसरा कोण? यासाठी पाठपुरावा करण्याची गरज आहे.

## महाराष्ट्र शासन

अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्या मान्यतेने अल्पसंख्यांक पोलिस शिपाई भरतीपुर्व प्रशिक्षण सन २०२५-२६

**(मुस्लिम, बौद्ध, जैन, शिख, ज्यु, ईसाह, पारशी, व ख्रिश्चन)**

प्रशिक्षण संस्था : आझाद हिंद ब.उ.से.संस्था म.कामखेडा ता.जि.बीड

प्रशिक्षणार्थी उमेदवारासाठी अटी-शर्ती

| अ.क्र. | तपशील | विवरण |
|---|---|---|
| १ | पात्रता | १२ वी उत्तीर्ण व त्यापेक्षा जास्त शिक्षणास प्राविण्य |
| २ | वय | १८ ते २५ वर्षे असावे |
| ३ | उत्पन्न | ८ लक्ष पो कमी (स्वयंघोषित) |
| ४ | उंची व छाती | पुरुष - 16cm फुगून 86cm<br>महिला - 155cm |
| ५ | शारीरिक चाचणी दिनांक | अर्ज केलेल्या उमेदवाराने शारीरिक चाचणीसाठी उपस्थित राहणे बंधनकारक. ९ जुलै २०२५ ला आझाद हिंद शाळा काझीनगर बीड येथे सकाळी १० वाजता सुरू होईल. |
| ६ | प्रशिक्षित कालावधी | ३ महिने निवासी/अनिवासी |
| ७ | अर्जाचा तपशील | अर्ज हस्तलिखित नमुना अर्ज, आधार सह झेरॉक्स प्रती अर्जासोबत जोडाव्या. |
| ८ | अर्ज करण्याचा दिनांक | दिनांक २८ जुन २०२५ ते ७ जुलै २०२५ पर्यंत स्विकारले जातील. |

अल्पसंख्यांक उमेदवाराने अर्ज आझाद हिंद सेमी इंग्लिश उर्दू शाळेत दररोज सकाळी १० ते सायं.५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष आणुन जमा करावे.

संपर्क नंबर : 9421277948, 8888687541, 9503545406

**शेख मुसा**
**सचिव**
आझाद हिंद संस्था
म.कामखेडा ता.जि.बीड

**मा.सुधाकरचंचाणे**
जिल्हा नियोजन, अल्पसंख्याक
अधिकारी जिल्हाधिकारी
कार्यालय, बीड

# वक्फ दुरुस्ती कायदा विरुद्ध निषेध सभेला बीडमध्ये जनसागर लोटला

## इनामी जमिनी बोगस खालसा, अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात अशीच एकजुटीची लढाई लढण्याची गरज

बीड । दिव्य रिपोर्टर

वक्फ दुरूस्ती विधेयक संशोधन २०२५ केंद्र सरकारने लागू केलेला आहे. मात्र हे दुरूस्ती विधेयक आम्हाला मान्य नसून ते आम्ही रिजेक्ट करून त्याचा निषेध करत आहोते. हा कायदा केवळ मुस्लीम समाजाच्याच विरोधात नाही तर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेल्या संविधानाच्या विरोधात आहे. केंद्र सरकारने हा कायदा रद्द केला नाही तर संपूर्ण भारतात मुस्लीम समाजच नव्हे तर सर्व समाज मिळून जे संविधान प्रेमी लोक आहेत त्यांना सोबत घेऊन जंतर-मंतरवर लोकशाही मार्गाने आंदोलन करून आणि दिल्ली जाम करू असा इशारा परभणी येथील मौलाना रफीयोद्दीन अशरफी यांनी बीडमध्ये माध्यमांशी बोलतांना दिला. तर जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही तोपर्यंत वक्फच्या पोर्टलवर रजिस्टर्ड करू नका असे आवाहन ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते कासीम रसुल इलियास साहाब यांनी केले. तसेच इनामी जमीन बोगस खालसा करणारे इनामी जमिनीवर अतिक्रमण करून ताबा घेणाऱ्यांवर अशीच एकजुटीने लढाई लढण्याची गरज असून मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने याकडेही गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.





### भूमाफियांच्या तावडीतून इनामी जमिनी वाचविण्यासाठी अशाच एकजुटीची गरज

रविवारी बीड शहरातील मोमीनपूरा बायपास येथील इज्तेमा मैदानावर वक्फ दुरुस्ती कायद्याविरुद्ध निषेध सभेला अक्षरश: जनसागर लोटलेला दिसून आला. या कार्यक्रमाला जिल्हाभरातील मुस्लिम बांधवांनी आपली उपस्थिती दर्शवली. तसेच बीड जिल्ह्यातील अनेक इनामी जागेवर भूमाफियांचा ताबा आहे. तसेच इनामी जमिनी अतिक्रमणाच्या विळख्यात आहेत. भूमाफियांच्या तावडीतून इनामी जमिनी वाचविण्यासाठी अशीच एकजुटीची गरज असून ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डने यासाठी मोर्चा उभारणी करण्याची गरज आहे. गेल्या अनेक दिवसांपासून दिव्य आधार इनामी जमिनीसंदर्भात प्रश्न उपस्थित करत आहे. बीड शहरातील जामा मस्जिदची अंदाजे ४०० एक्करपेक्षा जास्त जागा असून यातील अनेक जागेवर अतिक्रमण केलेले दिसून येत असून शहरातील जामा मस्जिद अशुरखान्याच्या जागेवर एका शिक्षणसंस्थेने कब्जा करून त्याठिकाणी शाळेची इमारत बांधली आहे. तसेच जामा मस्जिदच्या अनेक जागेवर भूमाफियांचा कब्जा दिसून येत आहे. तसेच अनेक इनामी जमिनी बोगस खालसा करून त्या जमिनीची खरेदी-विक्री झालेली असून याकडेही गांभीर्याने लक्ष देण्याची व एकजुटीने ही लढाई लढण्याची गरज आहे.

बीड येथील मोमीनपुरा बायपास रोडवरील इज्तेमागाह मैदानावर निषेध सभा सुरू होण्यापुर्वी ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे मौलाना उमरेन मेहफुज रहमानी साहाब, ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते कासीम रसुल इलियास साहाब आणि मौलाना रफीयोद्दीन अशरफी साहाब यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी प्रवक्ते इलियास म्हणाले की, केंद्र सरकारने आणलेले वक्फ विधेयक दुरूस्ती कायदा वक्फच्या फायद्यासाठी आणलेला नसून केवळ वक्फच्या प्रॉपर्टीजमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी आणलेला आहे. प्रॉपर्टी हडपण्यासाठी आणलेला आहे असा आरोप त्यांनी केला. ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड देशातील मुस्लीम समाजासोबत आहे, त्यामुळेच ऑल इंडिया पातळीवर अशा प्रकारचे कार्यक्रम आयोजीत करून लोकशाही मार्गाने वक्फ दुरूस्ती विधेयकाचा निषेध करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. हा कायदा येथील मुस्लीम समाजासह इतर अल्पसंख्यांक, आदिवासी, ओबीसी समाज, दलित समाजासाठी अनपेक्षित आहे. या प्रकरणात सध्या सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. सदरील कायद्यासंदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असतांना केंद्र सरकारने वक्फ पोर्टलच्या माध्यमातून सर्व वक्फ प्रॉपर्टीज रजिस्टर्ड करा असे आवाहन करणे योग्य नाही. ऑल इंडिया मुस्लीम पर्सनल लॉ बोर्डाच्या वतीने सर्व मुस्लीम समाजाला संदेश देण्यात आला असून जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय येत नाही तोपर्यंत वक्फ पोर्टलवर कोणतीही प्रॉपर्टी रजिस्टर्ड करू नका. आम्ही हे दुरूस्ती विधेयक पुर्णपणे रिजेक्ट करत आहोत. हे दुरूस्ती विधेयक वक्फ प्रॉपर्टीच्या विरोधात आहे. वक्फ प्रॉपर्टी सरकारची नसुन ती प्रॉपर्टी आमच्या पुर्वजांनी मस्जीद, कब्रस्तान, दर्गाह, इदगाह, खानखाह आणि चॅरिटेलबल कामासाठी दिलेली आहे. त्यामुळे या प्रापर्टीवर वक्फ बोर्डाने ताबा केलेला आहे, वक्फमध्ये भ्रष्टाचार आहे अशा प्रकारचा भ्रम निर्माण केला जात असल्याचा आरोप ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते कासीम रसुल इलियास साहाब यांनी केला.

# शिवप्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.रोहिदास गायकवाड यांचा स्तुत्य उपक्रम

बीड । दिव्य रिपोर्टर

रायमोह येथील मुस्लिम समुदायाच्या ईदगाहा परिसरामध्ये शिवप्रतिष्ठांचे संस्थापक अध्यक्ष समाजसेवक डॉ.रोहिदास गायकवाड यांच्या संकल्पनेमधून सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून ईदगाहा परिसरामधील भागामध्ये झाडे लावण्याचा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी शिरूर पंचायत समितीचे माजी उपसभापती श्री जालिंदर काका सानप रायमोहचे माजी सरपंच श्री हाशम भाई शेख माजी उपसरपंच श्री सुलेमान पठाण माजी उपसरपंच मुराद पठाण , पठाण गुलजार, शेख फारूख, शेख नजीरभाई रशीद पठाण युवराज



जाधव सर,शेख ताजुद्दीन सर सामाजिक प्रतिष्ठानचे प्रकाश गायकवाड शेख अकिल, गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# दुचाकी चालवताना हेल्मेट वापरण्याचे जिल्हाधिकारी जॉन्सन यांचे आवाहन

बीड । दिव्य रिपोर्टर

**जिल्हयातील सर्व नागरिक, शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी दुचाकी वाहन वापरताना हेल्मेट वापरावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.**

मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ मधील तरतुदीनुसार दुचाकी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करणे बंधनकारक आहे. याबाबत वेळोवेळी मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालय यांनी मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १२९ नुसार दुचाकी वाहन चालवताना हेल्मेट सक्तीचे आहे, असे



निर्णय दिलेले आहेत.

जिल्ह्यात सन २०२४ मध्ये रस्ता अपघातामधील मृत्यूंपैकी सर्वाधिक मृत्यू दुचाकीस्वार यांचे झालेले आहेत. यामध्ये ६० % पेक्षा जास्त अपघात मृत्यू हेल्मेट परिधान न करता गाडी चालविल्यामुळे झालेले दिसून येत आहेत. जिल्ह्याच्या विकासात प्रशासनाची भूमिका महत्वाची आहे. सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी हे प्रशासनाचा कणा समजण्यात येतात. शासकीय अधिकारी, कर्मचारी यांचे वर्तन समाजासाठी नेहमीच अनुकरणीय असे आहे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात येताना, सार्वजनिक रस्त्यावर वावरताना हेल्मेट परिधान केल्यास सर्व नागरिकांमध्ये हेल्मेट परिधान करण्याबाबत जनजागृती होते. त्यामुळे वाहनधारक स्वयंप्रेरणेने हेल्मेट वापरण्यासाठी प्रवृत्त होतात. जिल्हयातील सर्व शासकीय आस्थापना, महामंडळे, महानगर पालिका, नगर पालिका, नगर परिषद येथील अधिकारी, कर्मचारी यांनी दुचाकी वाहनाने शासकीय कार्यालयात येताना, रस्त्यावर दुचाकी वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी यांना दिले आहेत.

# मुस्लिम समाजाविरोधात सतत वक्तव्य करून हिंदू समाजाला मुस्लिम द्वेषासाठी प्रवृत्त करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा

पाटोदा । दिव्य रिपोर्टर

अल्पसंख्यांक मुस्लिम समाजा विरोधात सतत वक्तव्ये करून हिंदू समाजाला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या मुस्लिम द्वेषा साठी प्रवृत्त करून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचे सतत कट रचून देशात अस्थैर्य निर्माण करण्याचा प्रयत्न करणारा विरोधात गुन्हा दाखल करून कडक कारवाई करणे मागणी सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र शाखा पाटोदाच्या वतीने दि. २७ जुन २०२५ रोजी तहसीलदार यांच्या मार्फत राज्याचे राज्यपाल सी. पी. कृष्णन यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की मागील बऱ्याच काळापासून उल्लेखीत काही राजकारणी लोक अज्ञात लोकांसोबत मिळून कट रचल्या प्रमाणे सतत मुस्लिम अल्पसंख्यांक समाजा विषयी द्वेष निर्माण होईल व त्याद्वारे हिंदू समाजातील लोक मुस्लिमांविषयी चुकीची धारणा बाळगून त्यांच्या विरोधात हिंसा आणि लिंचिंग तसेच बहिष्कार करण्यास आपोआप बाध्य होतील अशा प्रकारची वक्तव्ये करीत




### सकल मुस्लिम युवक पाटोदा यांची राज्यपालांकडे मागणी

आहेत.मा. सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकारची वक्तव्ये करणाऱ्या लोकाविरोधात सरकारने स्वतः हुन गुन्हे दाखल करुन कडक कारवाई करण्याचा आदेश दिलेला आहे.

असे असतांना काही व्यक्ती सतत मुस्लिमांना निशाणा करुन द्वेषवर्धक वक्तव्ये व भाषण करून, व त्याची माहिती पद्धतशीर पणे सोशल मीडिया आणि इतर माध्यमातून पसरवून दोन समाजात तेड, व अल्पसंख्यांक मुस्लिम समाजात दहशत निर्माण करत आहेत. नितेश राणे ,संग्राम जगताप , महेश लांडगे , गोपीचंद पडळकर , मेधा कुलकर्णी व इतर या सर्व लोकांविरुद्ध मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशा अन्वये तात्काळ गुन्हे दाखल करुन त्यांनी कोणासोबत मिळून कट रचला आहे किंवा कसे याचा सखोल तपास करावा, तसेच त्यांना सामील असणाऱ्या सर्व कटातील सहभागी सूत्रधारांविरुद्ध जरब बसेल अशी कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. या निवेदनावर सकल मुस्लिम युवक पाटोदा समन्वयक,आदींच्या स्वाक्षरी आहेत.

# दहावी, बारावी परीक्षा केंद्र परिसरात मनाई आदेश

बीड । दिव्य रिपोर्टर

जिल्ह्यामध्ये उच्च माध्यमिक प्रमाणपत्र व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जून-जुलै-२०२५ आयोजित केल्या आहेत. बारावीची १६ जुलैपर्यंत आणि दहावी ८ जुलैपर्यंत परीक्षा आहे. या परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात व परीक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी, अनाधिकृत कृत्य होऊ नये याकरीता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आल्याचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी निर्गमित केले आहेत. परीक्षेच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना आदेश लागू राहणार नाहीत. परीक्षा केंद्राबाहेर व परिसरात परीक्षेसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी व परीक्षार्थी यांना वगळून दोन किंवा दोनपेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. परीक्षा केंद्राचे १०० मी परिसरातील सर्व झेरॉक्स केंद्र, फॅक्स केंद्र व ध्वनीक्षेपक इ. परीक्षा सुरु होण्याच्या एक तास अगोदरपासून ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीपर्यंत चालू ठेवण्यासाठी प्रतिबंध करण्यात येत आहे. शासकीय व परीक्षेसंबंधित कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहनाव्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम, मयताची अंत्ययात्रासाठी लागू राहणार नाहीत, असेही आदेशात नमूद आहे. बीड जिल्हयाच्या हद्दीतील परीक्षा केंद्राचे १०० मी परिसरात व परीक्षा साहित्य ठेवलेल्या ठिकाणी ०८ जुलैपर्यंतच्या कालावधीत त्या-त्या दिवशीच्या परीक्षेच्या वेळेच्या एक तास अगोदर ते परीक्षा पेपर संपेपर्यंतच्या कालावधीसाठी आदेश लागू राहतील, असेही आदेशात नमूद आहे.

# वंजारवाडी ग्रामपंचायतचा आदर्श जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या लोकप्रतिनिधींनी घेऊन काम करावे-जितीन रहेमान

### सकारात्मक भूमिकेतून कामे करणार ,मात्र चुकलेल्यांना वटणीवर आणणार,दिवाळीपर्यंत ७५००० घरकुलांची कामे पूर्ण करू

बीड । दिव्य रिपोर्टर

बीड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काल शुक्रवार रोजी पत्रकार परिषद घेऊन पत्रकारांशी संवाद साधला.

सि ई ओ जितिन रहेमान म्हणाले की मी या ठिकाणी आल्यानंतर काही गावांचा दौरा केला त्यात जनतेशी जवळून जाऊन संवाद साधत भावना जाणून घेतल्या जिल्ह्यातील माणसं खूप चांगली आहेत विकासासाठी सकारात्मक भूमिकेतून कामे करायचे असून चुकलेल्या कर्मचाऱ्यांना एकदा समज देऊ फरक पडला नाही तर कार्यवाही करणार असल्याचे त्यांनी सांगितले. आपल्याला जिल्हा परिषद अंतर्गत अनेक योजनेतून कामे करायचे आहेत यासाठी ग्रामपंचायत ,नरेगा, स्वच्छ भारत मिशन, तसेच शैक्षणिक बाबतीत जरेवाडी पॅटर्न प्रत्येक गावात राबवून शिक्षणाची क्रांती घडवायची आहे . ऊसतोड कामगारां बाबतही आपल्याला त्यांची देखभाल करून आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य मित्रमार्फत काम करण्याचेही त्यांनी सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की मी आल्यानंतर आठ दिवसांमध्ये अनेक गावांमध्ये गेलो असता अनेक मुद्दे माझ्या लक्षात आले गोरगरिबांसाठी असलेली घरकुल त्यासाठी दोन लाख टार्गेट असले तरी दिवाळी पर्यंत ७५००० घरकुल पूर्ण करण्यात येणार असून त्यासाठी वाळू चा मुद्दा अडचणीचा आलेला आहे



जिल्हाधिकारी यांच्याशी बोलून याबाबतीत मार्ग काढणार असल्याचेही त्यांनी सांगितले कामगार कल्याण विभागामार्फत मिस्त्रींची यादी मागून दिपावली पर्यंत ही घरकुल पूर्ण करण्याचे प्रयत्न करणार आहे अनेक ठिकाणी जागेचा प्रश्नही मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे त्यातूनही मार्ग काढून दोन लाख घरकुलाचे टार्गेट पूर्ण करण्याची सांगून शासनाच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पंधरा वित्त आयोगातून कामे करण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतच्या लोकप्रतिनिधींनी वंजारवाडी गावचा आदर्श घेऊन कार्य केले तर आपले गाव ही स्वच्छ व सुंदर होऊ शकते त्यासाठी प्रयत्न करावेत नरेगा बाबतीत विंधन विहिरी घरकुल याबाबतीत अधिकारी कर्मचाऱ्यांनी पैसे मागितले तर त्यांना एकदा समज देऊन नंतर पुन्हा पैसे मागितले तर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला शैक्षणिक दृष्ट्या जरेवाडी पॅटर्न राबवून जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुधरविणार असल्याचेही त्यांनी बोलताना सांगितले. आठ दिवसाच्या पाहणीतील कसे वाटले बीड असा प्रश्न पत्रकारांनी विचारताच हसतमुख चेहऱ्याने बीडची माणसं खूपच चांगली असून सकारात्मक कामे करत विकास साधायचा आहे असे बोलताना सांगितले.

# बीड माझं दुसरं घर आहे, इथल्या लोकांनी मला खूप प्रेम दिलं - प्रा. हमीद सुहरवर्दी

## डॉ. गजनफर इक़बाल ज्ञान व साहित्याची परंपरा पुढे नेत आहेत - न्यायमूर्ती ख्वाजा फारूक अहमद

### प्रसिद्ध अभिजात कथालेखक प्रा. हमीद सुहरवर्दी आणि बाल साहित्य पुरस्कार प्राप्त डॉ. ग़ज़नफर इक़बाल यांचा बीडमध्ये सत्कार

बीड । दिव्य रिपोर्टर

**जागतिक कीर्तीचे अभिजात कथालेखक प्रा. हमीद सुहरवर्दी आणि त्यांचे सुपुत्र, तीन राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त साहित्यिक आणि समीक्षक डॉ. ग़ज़नफर इक़बाल यांच्या बीड भेटीच्या निमित्ताने 'बज़्म-ए-अहबाब-ए-उर्दू, बीड' तर्फे त्यांचा सत्कार व स्वागत करण्यात आले. उल्लेखनीय आहे की प्रा. हमीद सुहरवर्दी यांनी बीडच्या एस. के. कॉलेजमध्ये तेवीस वर्षे उर्दू विभागप्रमुख म्हणून सेवा केली. सेवानिवृत्तीनंतर ते आपले मूळ गाव गुलबर्गा येथे परतले.**

या प्रसंगी प्रा. हमीद सुहरवर्दी म्हणाले की, बीड मला अत्यंत प्रिय आहे, हे माझं दुसरं घर आहे. इथल्या लोकांनी मला अपार प्रेम आणि आपुलकी दिली. जे प्रेम आणि आपलेपणा मला इथे मिळाले, ते माझ्या मूळ गावातसुद्धा फारसा मिळाला नाही. त्यांनी बीडची भूमी साहित्याच्या दृष्टीने अत्यंत सुपीक






असल्याचे सांगितले. त्यांनी ॲड. मंझूरुद्दीन, अहसन युसुफ़ज़ई, प्रा. शाह हुसैन नहरी, बदीउद्दीन सर, नदीम मिर्झा आणि अनेक साहित्यिकांबरोबर घनिष्ठ संबंध असल्याचे नमूद केले. तसेच अर्शद सिद्दीकी यांच्या साहित्यसेवेचेही त्यांनी कौतुक केले.

या कार्यक्रमात न्यायमूर्ती डॉ. ख्वाजा फारूक अहमद यांची विशेष उपस्थिती होती. डॉ. झुबेर हुसैनी, प्राचार्य एस. के. फूड अँड टेक्नॉलॉजी कॉलेज, बीड यांच्या राहत्या घरी, अक्सा कॉलनीत झालेल्या या छोट्याशा समारंभात न्यायमूर्ती फारूक अहमद यांनी आपल्या वडिलांचे - प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ स्वर्गीय ॲड. ख्वाजा मंझूरुद्दीन आणि प्रा. हमीद सुहरवर्दी यांच्यातील सख्याचे आणि साहित्यिक संबंधांचे स्मरण केले.

त्यांनी सांगितले की, प्रा. हमीद सुहरवर्दी यांनी बीडच्या भूमीत एक संपूर्ण पिढी घडवली. आज अनेक लेखक त्यांच्या मार्गावर चालत आहेत. त्यांनी बीडला खूप काही दिलं आहे. आज त्यांचे पुत्र डॉ. ग़ज़नफर इक़बाल त्यांच्या साहित्यिक वारशाला मोठ्या प्रतिष्ठा आणि समर्पणाने पुढे नेत आहेत.याप्रसंगी 'बज़्म-ए-अहबाब-ए-उर्दू, बीड' चे अध्यक्ष आणि नामवंत साहित्यिक अर्शद सिद्दीकी, हजरत नदीम मिर्झा आणि गुलाम साकिब यांनी भारत सरकारचा मध्यवर्ती बाल साहित्य पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. ग़ज़नफर इक़बाल यांना मनःपूर्वक अभिनंदन आणि सत्कार केला.

यावेळी कवी, साहित्यिक व कथालेखक गुलाम साकिब यांच्या 'उर्दू अकादमी महाराष्ट्र' पुरस्कार प्राप्त कथासंग्रह 'किरदार' चे प्रकाशन प्रा. हमीद सुहरवर्दी आणि डॉ. ग़ज़नफर इक़बाल यांच्या हस्ते करण्यात आले.हाजी सादिक किरमानी (गुलबर्गा), डॉ. झुबेर हुसैनी, शेख रबी अहमद व इतर मान्यवरांची यावेळी विशेष उपस्थिती होती.कार्यक्रमात अर्शद सिद्दीकी यांच्यावर लिहिलेली 'रोशनी का मुसाफिर' आणि हजरत नदीम मिर्झा यांच्यावर आधारित 'नक़्श-ए-पिरहन', तसेच अर्शद सिद्दीकी यांच्या इतर पुस्तकांची प्रत देखील या मान्यवरांना भेट देण्यात आली. गुलाम साकिब यांच्या आभारप्रदांशन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# क्लासेस चालकांचा टर्न ओव्हर प्लॅन कोट्यवधीची जीएसटी लॅप्स




जीएसटी विभागाने सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर करावी क्लासेसची पोलखोल

विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन फिस घेण्यासाठी इतर शिक्षकांच्या अकाउंटचा वापर

**विद्यार्थ्यांनी रोख फिस दिली तर कच्च्या पावत्या देवून त्या पावत्या नंतर नष्ट करत असल्याची शंका**

**टॅक्स विभागाने सुरू असलेल्या खासगी क्लासेसवर अचानक रेड करण्याची गरज, भयानक प्रकार उघडकीस येण्याची शक्यता**

दिव्य आधार
सोमवार, दि. ३० जून २०२५ (पान-४)

# रेग्युलर टॅक्स भरून जीएसटी बुडविण्याचा फंडा




**शहरातील एका क्लासेस चालकावर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला, त्या क्लासेस चालकाचे बीडसह इतर जिल्ह्यातही क्लासेसच्या ब्रँचेस सुरू असल्याची मिळाली माहिती शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुल, सहयोग नगर व आशा टॉकीज जवळही वेगवेगळ्या नावाने त्या क्लासेस चालकाचे एकट्या बीड शहरात तीन ब्रँच सुरू असल्याची चर्चा**

**त्या क्लासेसमध्ये अंदाजे १ हजार ते १५०० विद्यार्थी-विद्यार्थीनी दररोज सकाळी ७ सायंकाळी ७ पर्यंत शिक्षण घेत असल्याची मिळाली माहिती, एका विषयाची पॅकेज फिस ३० ते ४० हजार रुपये तर दिडहजार विद्यार्थ्यांची एकूण फिस किती?**

बीड :

शहरातील शाहुनगर परिसरात उमाकिरण शैक्षणिक संकुल येथे विविध खासगी क्लासेस सुरू असल्याने शहरासह जिल्हाभरातील विद्यार्थी-विद्यार्थीनी त्या संकुलमधील क्लासेसमध्ये शिक्षण घेवून आपल्या भविष्याची पुढील वाटचाल करतात. त्या शैक्षणिक संकुलमधून अनेक विद्यार्थी मोठ्या पदावर आज विराजमान आहेत. परंतु मागील आठवड्यात त्या संकुलमधील एका खासगी क्लासेस चालकावर एका विद्यार्थीनीने गंभीर आरोप केल्यानंतर त्या क्लासेस चालकासह तेथील प्राचार्यावर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर या प्रकरणाला राजकीय वळण देण्याचे काम काहींनी केले परंतु ज्या पद्धतीने अत्याचार झालेल्या विद्यार्थीनीने आरोप केलेले आहेत ते आरोप पाहता या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे इतर विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात टाकण्यासारखे होणार आहे. म्हणून पोलीसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेवून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणीही जोर धरत आहे. प्रकरणाचे गांभीर्य पाहून पोलीस प्रशासनाने या प्रकरणात तातडीने गुन्हा दाखल केला असला तरी अद्यापपर्यंत आरोपींना ताब्यात घेतले नसल्याने आरोपी व पोलीस प्रशासनाच्या विरोधात रोष वाढत आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी अक्षरश: पोलीस प्रशासनाला उमाकिरण शैक्षणिक संकुल येथे पाचारण करून पोलीस बंदोबस्त लावण्याची वेळ आली होती. दिवसभर त्या परिसरातील इतर व्यवसाय बंद ठेवण्यात आले होते. त्या संकुलमध्ये इतर खासगी क्लासेससुद्धा आहेत. गुन्हा एका क्लासेसमध्ये घडला असला तरी इतर क्लासेस संदर्भातही पालकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केला असल्याने विद्यार्थ्यांसह त्या परिसरातील इतर खासगी क्लासेसचे भवितव्य अंधारात दिसून येत आहे. पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल होणे हा फिर्यादी संदर्भातचा विषय असल्याने पोलीस प्रशासन योग्य कारवाई करतीलच परंतु त्यापुढे जावून या खासगी क्लासेसमधून होणारा आर्थिक व्यवहार वर्षाकाठी होणारा टर्नओव्हर अशा अनेक बाबी संदर्भात दिव्य आधारने पाठपुरावा करून यामागील सत्य बाहेर काढण्याचे प्रयत्न केले असून टॅक्स विभागाने या वृत्ताचा गांभीर्याने पाठपुरावा केला तर अनेक गंभीर बाबी समोर येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झालेल्या त्या खासगी क्लासेस चालकाचे बीड शहरात तीन ठिकाणी क्लासेस सुरू असल्याची प्राथमिक माहिती मिळाली असून उमाकिरण शैक्षणिक संकुल, सहयोगनगर व आशा टॉकीज परिसरात या क्लासेस सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. त्याशिवाय त्या क्लासेस चालकाची शहरात एक इंग्रजी शाळाही सुरू असून याशिवाय कर्जत परिसरात क्लासेस, जामखेड परिसरात खासगी क्लासेस तसेच छत्रपती संभाजीनगर येथेही खासगी क्लासेस सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात त्या खासगी क्लासेस चालकाच्या क्लासेस व शाळा सुरू असतील तर वर्षाकाठी कोट्यवधीचा टर्नओव्हर होणे अपेक्षित आहे. परंतु काही खासगी क्लासेस चालक जीएसटी टॅक्स बुडविण्यासाठी वर्षाचे कमी टर्नओव्हर दाखवून टॅक्स विभागाचा गेम करत असल्याचे दिसून येत आहे. नियमाने जर वर्षाला पन्नास लाख रुपयांचे टर्नओव्हर होत असेल तर जीएसटी अकाउंट उघडून जीएसटी भरणे बंधनकारक आहे. परंतु काही क्लासेस चालक कमी टर्नओव्हर दाखवून रेग्युलर टॅक्स भरून मोकळे होतात. मिळालेल्या माहितीनुसार पोस्कोअंतर्गत गुन्हा दाखल झालेल्या त्या खासगी क्लासेस चालकाकडे अंदाजे एक हजार ते दिड हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्रति विद्यार्थी एका विषयाचे ३० ते ४० हजार रुपये फिस तो क्लासेस चालक वसूल करत होता. जर दिड हजार विद्यार्थ्यांचे ३० ते ४० हजार रुपये प्रमाणे प्रति विद्यार्थी फिस वसूली होत असेल तर वर्षाकाठी कोट्यवधीची उलाढाल होणे अपेक्षित आहे. जर वर्षाला कोट्यवधीची उलाढाल होत असेल तर त्या खासगी क्लासेस चालकाला जीएसटी भरणे बंधनकारक आहे. परंतु हे क्लासेसचालक रेग्युलर टॅक्स भरून कमी टर्नओव्हर दाखवून जीएसटी बुडविण्यासाठी हे षडयंत्र करत असल्याचे दिसून येत असून जीएसटी विभागाने अशा खासगी क्लासेस चालकांच्या मालमत्तेचा आढावा घेण्याची गरज आहे.टॅक्स विभागाने खासगी क्लासेस चालकांकडून विद्यार्थ्यांची माहिती मागवून याविषयी पाठपुरावा केला तर शासनाच्या तिजोरीत कोट्यवधी रुपयांची जीएसटीतून भर पडेल हे मात्र खरे आहे.

## अचानक रेड करण्याची गरज

शहरातील शाहूनगर परिसरात उमाकिरण संकुल येथे अनेक खासगी क्लासेस सकाळी ७ ते सायंकाळी ७ पर्यंत सुरू असतात. मिळालेल्या माहितीनुसार त्या संकुलमध्ये दरररोज हजारो विद्यार्थी शिकवणीसाठी येतात. एका विषयाची शिकवणीसाठी संबंधित खासगी चालक ३० ते ४० हजार रुपये फिस आकारतात. परंतु कागदोपत्री कमी फिस दाखवून टॅक्स विभागाचा मागील अनेक वर्षांपासून गेम होत असल्याचे यातून दिसून येत असून अनेक खासगी क्लासेसवाल्यांचे जीएसटी अकाउंटही सुरू नसल्याची बाब समजली आहे. हे खासगी क्लासेस चालक रेग्युलर टॅक्स भरून कोट्यवधी रुपयांचा जीएसटी टॅक्स बुडवित असल्याची बाब यातून स्पष्ट होत असून जीएसटी विभागाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. तसेच टॅक्स विभागाने या संकुलमध्ये सुरू असलेल्या खासगी क्लासेसवर अचानक रेड करून पालकांशी संवाद साधला तर सर्व बाबी स्पष्ट होतील.

## इतर शिक्षकांच्या अकाउंटचा वापर

खासगी क्लासेस चालकांकडे काही शिक्षक शिकवणीसाठी कर्तव्यावर असतात. त्याचा फायदा घेत खासगी क्लासेस चालक पालकांनी ऑनलाईन फिस दिली तर त्या शिक्षकांच्या अकाउंटवर फिस स्विकारतात. जर पालकांनी रोख फिस भरली तर त्या पालकांना कच्च्या पावत्या कमी रकमेच्या देतात. यात पालकही मॅनेज असते. दिलेल्या कच्च्या पावत्या नंतर नष्ट केल्या जातात. खासगी क्लासेसचालक स्वत:च्या अकाउंटवरून कमी टर्नओव्हर दाखविण्यासाठी इतर शिक्षकांच्या अकाउंटचा वापर करतात. अशाप्रकारे कमी टर्नओव्हरचे हे चक्रव्यूह टॅक्स विभाग भेदणार का? हा महत्त्वाचा प्रश्न असून जर त्या खासगी क्लासेस चालकाच्या मालमत्तेचा आढावा घेतला तर सर्व सत्य बाबी समोर येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## शिक्षकांचे अकाउंट आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर टॅक्स विभागाने कारवाई करण्याची गरज

खासगी क्लासेसमध्ये हजारो विद्यार्थी दरवर्षी शिक्षण घेतात, या विद्यार्थ्यांकडून क्लासेस चालक अंदाजे एका विषयाचे २५ ते ३० हजार रुपये फिस आकारतात, जर हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असतील तर वर्षाकाठी कोट्यवधीची उलाढाल होणे शक्य आहे. परंतु काही क्लासेस चालक आपल्याकडील शिक्षकांच्या अकाउंटवर किंवा ऑफलाईन पैसे घेवून कच्च्या पावत्या कमी पैशाच्या देतात. टॅक्स विभागाने क्लासेसमधील शिक्षकांच्या अकाउंटची तपासणी करण्याची गरज आहे. तसेच खासगी क्लासेसमध्ये सीसीटीव्ही बसविलेले आहेत. टॅक्स विभागाने या सीसीटीव्ही फुटेजच्या सहाय्याने विद्यार्थ्यांची संख्या पाहून कारवाई करण्याची गरज असून कमी टर्नओव्हर दाखवून टॅक्स बुडविण्याचा हा क्लासेसचालकांचा प्लॅन असून यातून कोट्यवधीचा जीएसटी टॅक्स लॅप्स होत असल्याचे दिसून येत आहे.

**जर एका विषयाचे विद्यार्थ्याकडून ३० ते ४० हजार रुपये फिस घेत असतील तर आणि हजारो विद्यार्थ्यांचे ॲडमिशन त्या क्लासेसमध्ये असेल तर दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल होणे अपेक्षित**

**नियमाने दरवर्षी ५० लाखांची उलाढाल होत असेल तर जीएसटी अकाउंट उघडणे बंधनकारक परंतु कमी टर्न ओव्हर दाखवून रेग्युलर टॅक्स भरून जीएसटी टॅक्स बुडविण्याचे हे षडयंत्रच म्हणावे लागेल.**

**विद्यार्थ्यांच्या पालकांकडून ३० ते ४० हजार रुपये फिस घ्यायची आणि पालकांना १० हजार रुपयांची पावती द्यायची असाही प्रकार होत असल्याची माहिती समोर आली असून टॅक्स विभागाने त्या क्लासेस चालकाचा मागील तीन वर्षांचा आढावा घेण्याची गरज**

**शहरातील तीन ठिकाणी खासगी क्लासेस व एक इंग्रजी शाळा त्याशिवाय कर्जत परिसरात क्लासेस, जामखेड परिसरात क्लासेस तसेच छत्रपती संभाजीनगर येथेही या क्लासेसच्या ब्रँच सुरु असल्याची शंका, टॅक्स विभागाने एकाचवेळी सर्व क्लासेसचा आढावा घेवून त्या क्लासेस चालकाची मालमत्ता तपासण्यायची गरज**

## सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह

उमाकिरण शैक्षणिक संकुलमध्ये दररोज हजारो विद्यार्थीनी शिक्षणासाठी येतात. या विद्यार्थीनींच्या सुरक्षेची जबाबदारी संबंधित क्लासचालकांची आहे, यासाठी क्लासेसचालकांनी अधिकृत सुरक्षागार्डची त्याठिकाणी नेमणूक करणे अत्यंत गरजेचे असताना मिळालेल्या माहितीनुसार काही खासगी क्लासेस चालक स्वत:चे सुरक्षागार्ड उभे करून फक्त वाहनाच्या पार्कींगकडे लक्ष देत असल्याचे नेहमी दिसून येते. मध्यंतरी काही वादावादी झाल्याने त्याठिकाणी मोठा जमावडा जमला होता. एकंदरीत त्या क्लासेस चालकांनी अधिकृत सुरक्षारक्षकांची नेमणूक करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकडे लक्ष देण्याची अत्यंत गरज आहे. मागील आठवड्यात ज्या पद्धतीने क्लासेस चालकावर लैंगिक अत्याचार संबंधात गुन्हा दाखल झाला त्यामुळे पालक वर्गात दहशत निर्माण झाली असून त्याचा फटका सर्वच क्लासेस चालकांना बसणार हे मात्र खरे आहे.

# बनावट झोन प्रमाणपत्राच्या आधारावर एन-ए लेआऊट तर मग प्रशासन गप्प का?

**त्या झोन प्रमाणपत्रावरी तत्कालीन मुख्याधिकारी निता अंधारे यांची बोगस स्वाक्षरी असल्याचे लेखी पत्र, जमिनीची कोणतीच मोजणी न करता तयार केलेले नकाशे आले कोठून? बोगसगिरी झाल्याचे स्पष्ट तर मग कारवाई करण्यास टाळाटाळ का?**

बीड । दिव्य रिपोर्टर

पाटोदा तहसीलदार यांनी एन-ए लेआऊट करून दिल्यानंतर याप्रकरणी तक्रारदाराने पाठपुरावा केल्यानंतर ज्या कागदपत्राच्या आधारावर पाटोदा तहसीलदार यांनी एन-ए लेआऊट करून दिले ती कागदपत्रे बनावट असल्याचे स्पष्ट झाले. बनावट झोन प्रमाणपत्र तसेच जमिनीची मोजणी न करता भूमिअभिलेख कार्यालयाचा नकाशा या सर्व कागदपत्रावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले तर मग प्रशासन या प्रकरणी कारवाई करण्यास टाळाटाळ का करत आहे? हा महत्त्वाचा मुद्दा असून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पाटोदाच्या या प्रकरणाकडे लक्ष देण्याची गरज आहे.

पाटोदा नगरपंचायतचे तत्कालीन मुख्याधिकारी निता अंधारे यांच्या बोगस स्वाक्षरीचे झोन प्रमाणपत्र तयार करून तसेच भूमिअभिलेख कार्यालयात जमिनीची कोणतीही मोजणी न करता तयार करण्यात आलेले नकाशे बनावट असल्याचा अहवाल असताना तसेच तत्कालीन मुख्याधिकारी निता अंधारे यांनी लेखीपत्र देवून झोनप्रमाणपत्रावरील स्वाक्षरी स्वत:ची नसल्याचे सांगितलेले असताना या प्रकरणी पाटोदा तहसीलदार यांनी संबंधितांवर कारवाई का केली नाही? हा महत्त्वाचा प्रश्न असून अशा प्रकारे बोगसगिरी करणाऱ्यांवर प्रशासनाने कायदेशीर कारवाई केली तर पुढे असे प्रकार होणार नाही परंतु प्रशासनच अशांना पाठिशी घालत असल्याने प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. आता या प्रकरणाकडे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष देण्याची गरज असून या घटनेची पार्श्वभूमी अशी की, पाटोदा नगरपंचायत हद्दीतील ग्रीनझोन असलेल्या जागेला येलो झोन दाखवून सदरील जागेचे एन-ए लेआऊट करण्यात आले होते. येलोझोनचे प्रमाणपत्र तयार करून त्या प्रमाणपत्रावर तत्कालीन मुख्याधिकारी निता अंधारे यांची बनावट स्वाक्षरी करण्यात आली होती. एकंदरीत सर्व बाबी पारदर्शक असतानाही प्रशासन कारवाई करत नसल्याचे दिसून येत असून जिल्हाधिकारी यांनी याप्रकरणी आपल्या स्तरावर चौकशी समिती स्थापन करून या प्रकरणाची चौकशी करावी अशी सर्वस्तरावरून मागणी होत आहे.

## बोगस स्वाक्षरीचे रॅकेट

पाटोदा नगरपंचायत विभाग व पाटोदा तहसील कार्यालयात बोगस स्वाक्षरी करून बनावट कागदपत्राच्या आधारावर जमिनीसंदर्भातचे विषय निकाली काढण्याचे काम सुरु असल्याचा संशय असून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बोगस स्वाक्षरी करणारे रॅकेट पाटोद्यात सक्रीय असल्याचे दिसून येत आहे. पाटोदा तहसीलदार यांनी या प्रकरणी लक्ष देवून पाटोदा निबंधक कार्यालयाला सदरील जमिनीची खरेदी-विक्री थांबविलेली असली तरी झालेले एन-ए लेआऊट हे बनावट कागदपत्राच्या आधारावर झालेले आहे. त्या दृष्टीकोनातून पाटोदा तहसीलदार यांनी ते एन-ए लेआऊट रद्द करण्याची गरज असून यात गायरान जमिन हडपण्याचेही षडयंत्र असल्याचे दिसून येत आहे.

# अवैधरित्या गुटखा बाळगुन चोरटी विक्री करणाऱ्यावर पोलीसांचा छापा

## ५४ हाजारांचा मुद्देमाल जप्त; दोघाजणां विरोधात गुन्हा दाखल

माजलगाव । दिव्य रिपोर्टर

येथील शहर पोलीसांना गोपनिय माहीतीच्या आधारे शहरातील जुना मोंढा भागातील न्यु तुळजाभवानी ट्रेडर्स किराणा दुकान दुकानावर दि २७ जुन शुक्रवार रोजी रात्री ०८:२० वाजता छापा मारुन नमुद दुकानातुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला राजनिवास, जाफरानी जर्दा, डायरेक्टर, आरएमडी,हिरा पानमसाला,गोवा असा वेगवेगळ्या कंपनीचा ३९६१६/- रुपये किमतीचा गुटखा व एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल असा एकुण ५४६१६/-रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन सदर गुटखा स्वतःच्या ताब्यात बाळगुन चोरटी विक्री करणारा संजय शिवाजीराव होके वय ३४ वर्षे रा. पाटील गल्ली माजलगांव तसेच इतर एका विरुध्द गु.र.नं.२३८/२०२५ कलम १२३,२७४,२७५,३ (५) भारतीय न्याय संहीता प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.सदरची



कारवाई नवनित कॉवत,पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई,नीरव राजगुरु, उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई अति. पदभार उपविभाग माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, सहा.पोलीस निरीक्षक प्रल्हाद मुंडे,पोलीस अंमलदार अंगद घोडके,महादेव बहीरवाळ यांनी केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रिजवान खलील यांनी माऊली ऑफसेट माळीवेस, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे छापून साप्ताहिक दिव्य आधार कार्यालय बशीरगंज, जयहिंद प्लाझा, नगरपालिकेजवळ, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे प्रकाशित केले आहे. मो. ९५६१८४०१८४ या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, वाद-विवाद बीड न्यायालय अंतर्गत.